दैनिक
# मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ ● https://epaper.marathwadapatra.com

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ● अंक १८१ ● बुधवार, दि. ०९ ऑक्टोबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ● पाने ४ ●किंमत ३ रूपये










## नवरात्र उत्सव

सातवी माळ



सप्तमीचे दिवशी सप्तशृंग
गडावरी हो । तेथे तु
नांदशी भोवती पुष्पे
नानापरी हो । जाईजुई
शेवंती पूजा रेखियली
बरवी हो । भक्त संकटी
पडता झेलुन घेशी
वरचेवरी हो ।।७।।
उदो बोला उदो अंबबाई
माऊलीचा हो ।
उदोकर गर्जती काय
महिमा वर्णू
तिचा हो ।।

# शिवसैनिकांनो, बीड विधासभेची जागा जिंकायची असेल तर मोठ्या ताकदीने कामाला लागा: डॉ श्रीकांत शिंदे



●बीडमधील अनिलदादांचा झंझावात विधान भवनात पोहचला पाहिजे: अर्जुनराव खोतकर
●डॉ श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत विधानसभा जनसंवाद दौरा मेळावा संपन्न!



**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब तळागाळातील जनतेसाठी अठरा-अठरा तास काम करत लोककल्याणकारी योजना अमलात आणत आहेत त्यामुळे या योजनाचा लाभ घराघरात पोहचवा. मुख्यमंत्री शिंदे साहेबांची कुशल कार्यप्रणाली सामान्य जनतेपुढे मांडा. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत आपला विजय पक्का आहेच. मात्र आपल्याला मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी आणि महाराष्ट्रावर आपल्या शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी मोठ्या ताकदीने काम करावे लागेल. बीड विधानसभेची जागा जिंकायची असेल तर शिवसैनीकांनो कामाला लागा, वेळ कमी राहिलेला आहे. बीड मतदार संघात जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप हे जोमाने काम करत असून आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत असे आवाहन करत अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी बीड मतदार संघात विकास कामाबाबत आमच्यासमोर यादी दिलेली आहे. येत्या काही दिवसात ती कामे आम्ही पूर्ण करू असे डॉ श्रीकांतजी शिंदे साहेबांनी शिवसैनिकांना अश्वस्त केले. बीड विधानसभेच्या तोंडावर काल दि. ८ ऑक्टोबर रोजी दु ३.०० वाजताच्या दरम्यान बीड नगरीत शिवसेना नेते संसदरत्न खासदार मा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानसभा जनसंवाद दौरा मेळावा संपन्न झाला. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांनी शिवसैनिकांशी मुक्त संवाद साधल्याने बीड शिवसैनकांच्या अंगी नवीन ऊर्जा संचारल्याचे दिसून येत आले. याप्रसंगी शिवसेना प्रवक्ते संजय निरुपम, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, बाप्पूसाहेब मोरे यांच्यासह शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी- लोकप्रतिनिधी, महिला-भगिनी, शिवसैनिक आणि पत्रकार बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

**▸बीडमधील अनिलदादांचा सुरु झालेला झंझावात विधान भवनात पोहचला पाहिजे- अर्जुनराव खोतकर**

बीड मतदारसंघांमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांचा झंजावात सुरू ▸▸ उर्वरित पान २ वर

## बियाणे समिती : केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या उपससमितीच्या सदस्यपदी गोविंद देशमुख, विष्णुपंत सोळंके, अतुल मुंडे यांची निवड

### कृषिमंत्री धनंजय मुंडे, आ.पंकजाताई मुंडे यांनी केले अभिनंदन



**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालय अंतर्गत महाराष्ट्र राज्य कृषी आणि फलोत्पादन बियाणे उपसमितीच्या सदस्यपदी परळी वैजनाथ येथील गोविंदराव देशमुख, ॲड.विष्णुपंत सोळंके, अतुल मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने याबाबतचे परिपत्रक नुकतेच जाहीर केले आहे. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने या पदाधिकाऱ्यांची शिफारस केली होती.

केंद्र सरकारच्या केंद्रीय कृषी मंत्रालया अंतर्गत केंद्रीय बियाणे समिती कार्यरत असते. ही समिती राज्यनिहाय उपसमित्यांची नेमणूक करते. बियाणे कायदा, १९६६ च्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व बाबींवर राज्य सरकारला सल्ला देणे, राज्यातील बियाणे कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आणि राज्य सरकार/केंद्रीय बियाणे समितीला नियतकालिक अहवाल पाठवणे, राज्य बियाणे चाचणी प्रयोगशाळेची तपासणी करणे आणि बियाणे कायद्यांतर्गत राज्य बियाणे चाचणी प्रयोगशाळा म्हणून घोषित करण्यासाठी तिच्या योग्यतेचा अहवाल राज्य सरकारला देणे, बियाणे कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी प्रोत्साहन देणे, राज्यासाठी पिकांच्या नवीन जाती घेण्याचा विचार करणे, राज्यात नव्याने प्रसिद्ध झालेल्या वाणांच्या कामगिरीवर लक्ष ठेवणे ही या समितीचे प्रमुख कार्य आहेत. या उपसमितीचे मुख्यालय मुंबई येथे असणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या सचिव या समितीच्या अध्यक्ष आहेत. तर कृषी आयुक्त, बियाणे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सर्व कृषी विद्यापीठांचे संशोधन संचालक आणि कृषी विभागाशी संबंधित विविध ▸▸ उर्वरित पान २ वर

## हरियाणात सलग तिसऱ्यांदा भाजपचे सरकार



**वृत्तसंस्था**

हरियाणात भाजप तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार आहे. राज्यात असे करणारा हा एकमेव पक्ष असेल. राज्यातील एकूण ९० जागांपैकी पक्षाने ४८ जागा जिंकून बहुमत मिळवले आहे. २ जागांची अधिकृत घोषणा बाकी आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यावेळी ८ जागांची वाढ झाली आहे. दुसरीकडे, काँग्रेसने ३७ जागांवर विजय मिळवला आहे. या निवडणुकीत ६ जागांचाही फायदा झाला आहे. मुख्यमंत्री नायब सैनी लाडवा आणि काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री भूपेंद्र हुड्डा गढी-सांपला मतदारसंघातून विजयी झाले आहेत. काँग्रेसने हा निकाल धक्कादायक असल्याचे म्हटले आहे. सीएम सैनी म्हणाले की, जनतेने काँग्रेसचा खोटारडेपणा नाकारला आहे.

भाजपच्या आघाडीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांना फोन करून विजयाबद्दल अभिनंदन केले. दरम्यान, नवीन सरकारचा शपथविधी दसऱ्याला म्हणजेच १२ ऑक्टोबरला होणार असल्याच्या बातम्या येत आहेत.

## बीड शहराचे सांस्कृतिक वैभव टिकावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न: माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचा प्रयत्न आणि सातत्याने केला आहे बीड जिल्हा संतांची भूमी जशी आहे तशी कलाकारांची भूमी आहे या भूमीत अनेकांमध्ये कलाकार दडलेले आहेत, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा हाच आमचा हेतू असतो असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे.

काकू-नाना प्रतिष्ठान आणि जयदत्त अण्णा क्षीरसागर विचार मंचच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीच्या अंतिम फेरी ग्रँड फिनाले सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयाच्या मैदानात आयोजित करण्यात आला होता. प्रारंभी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शुभारंभ करण्यात आला. यावेळी अरुण डाके, डॉ.विजुताई मर्हिद्रे, सिनेअभिनेता आणि निवेदक क्रांती नाना माळेगावकर, बालकलाकार सह्याद्री माळेगावकर, महिला आघाडी प्रमुख जयश्रीताई विधाते, नगरसेवक मुखिद लाला, मनोज मस्के, ॲड. शेख खाजा, किर्तीताई पांगारकर, उषाताई सरवदे, भारती क्षीरसागर, अंजली पवार, जयश्री म्हेत्रे आणि तब्बल वीस दिवस प्रत्येक प्रभागात उत्कृष्ट सूत्रसंचालन करून कार्यक्रम यशस्वी करणारे निवेदक सुरेश साळुंके आदी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,राजकारण आणि समाजकारण या व्यतिरिक्त स्व. काकूंच्या काळापासूनच आम्ही जनतेची नाळ कधी तुटू दिली नाही कुठलाही जातीभेद न करता अल्पसंख्यांक असतानाही बीड शहराच्या, मतदार संघाच्या आणि जिल्ह्याच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिलो आहोत, बदलत्या राजकारणामुळे प्रचंड अफवांचे पेव फुटले आहे पण अशाही परिस्थितीत आम्ही समाजाचे काहीतरी देणे लागतो या उदात्त भावनेतून लोकांच्या हिताचे जे ▸▸ उर्वरित पान २ वर

## निपाणी जवळका ग्रामपंचायत मध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार?

### सरपंच व ग्रामसेवक यांनी १५ वा वित्त आयोग व मनरेगा काम न करता बीले काढले :दिंगाबर लोणकर

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मौजे निपाणीजवळका ग्रामपंचायत मध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप येथील दिगंबर लोणकर यांनी केला आहे या विषयी त्यांनी लेखी स्वरूपात निवेदन गटविकास अधिकारी गेवराई यांना दिले आहे

तालुक्यातील निपाणी जवळका ग्रामपंचायत मध्ये सरपंच व ग्रामसेवक यांनी १५ वा वित्त आयोग ची कामे कागदोपत्री दाखवून अंदाजे लाखो रुपये भ्रष्टाचार केला असून मनरेगा अंतर्गत सार्वजनिक कामामध्ये कामे न करताच बिल उचलून घेतले जात आहेत. यात पांदन रस्ते, सिमेंट रस्ते आहेत दुसऱ्या योजनेतून झालेली कामे मनरेगाची म्हणून दाखवली जात आहेत. दोन वर्षात एकही ग्रामसभा न घेता कागदोपत्री ग्रामसभा घेतल्याचे दाखवले जात आसल्याचे त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे या बाबत गटविकास अधिकारी यांनी तक्रारीची सखोल चौकशी करावी

## विकासाचा आश्वमेध सुरच ठेवायाचा असेल तर गेवराईत लक्ष्मण पवारा शिवाय पर्याय नाही

### कहो दिलसे आण्णा फिरसे... जनतेत होऊ लागली चर्चा




**गेवराई । प्रतिनिधी**

विधानसभा मतदारसंघात गावोगावी विकास जाव म्हणून आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात प्रामाणिक प्रयत्न केले आहे यांची साक्षीदार मतदारसंघातील मतदार आहे आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी आमदार झाल्यानंतर लगेचच गेवराई मतदारसंघातील राशन वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडे करुन तत्कालीन अन्न पुरवठा नागरी मंत्री स्वर्गीय गिरीश बापट साहेब यांच्याकडे पाठपुरावा करून राशनचा काळाबाजार बंद करण्यासाठी राशन व्यवस्था ऑनलाईन केली पाहिजे अशी मागणी आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी त्यांच्या त्यांच्याकडे करून ऑनलाईन पद्धत सुरू झाल्यानंतर राशींच्या काळा बाजारावर प्रतिबंध लागेल असे ते म्हणाले होते

आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या मागणीची दखल घेत महाराष्ट्र सरकारने राशन वितरण व्यवस्थेत बायोमेट्रिक प्रणाली लागू लागू करून सर्व रेशन कार्डधारकांना न्याय देण्याचा आमदार लक्ष्मण पवार साहेबांनी प्रयत्न केलेला आहे त्यामुळे आज थम दिल्याशिवाय राशन मिळत नाही त्यामुळे राशींच्या होणाऱ्या काळबाजारावर बऱ्यापैकी परिणाम झालेला आज महाराष्ट्रात दिसत आहे हे आमदार लक्ष्मण पवार साहेबांच्या आमदारकीच्या काळातील पहिले यश आहे

त्यानंतर गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये सन २०१२, २०१३,२०१४, मध्ये गेवराई मतदार संघाचा दौरा करत असताना▸▸ उर्वरित पान २ वर

# होते जिवाजी म्हणून वाचले शिवाजी




**● शिवरायांनी आपल्या अनेक छोट्या–छोट्या मावळ्यांच्या मदतीने प्रचंड मोठे हिंदवी स्वराज्य निर्माण केले; परंतु स्वराज्य निर्माण करताना, अनेक मौल्यवान हिरे लयाला गेले. त्यांच्या या कार्यात तन–मन–धनाने या सर्वांनी सहकार्य केले. यात सर्वात महत्त्वाची भूमिका शिवरायांचे अंगरक्षक जिवाजी महाले यांची होती. प्रतापगडाच्या पायथ्याशी मु. पो. कोंडवली, जि. सातारा येथील साकपाळ कुटुंबात वीर जिवाजींचा जन्म ९ ऑक्टोबर १६६५ (अश्विन शुद्ध ६ शके १५५७) रोजी झाला. आईवडिलांच्या निधनानंतर जिवाजी आणि त्यांच्या भावंडांचा सांभाळ देव महाले या आप्ताने केला. तेव्हापासून त्यांचे आडनाव महाले पडले. बालपणापासून त्या काळी आलेल्या धकाधकीच्या संकटातून लढायांच्या काळात मुलांना लढाईचे प्रशिक्षण दिले जायचे. जिवाजीसुद्धा साता–याच्या तालमीतला लाल मातीत मेहनत करणारा पठ्ठा होऊ लागला. जोर, बैठका, तलवारबाजी, दांडपट्टा चालवणे याचे शिक्षण त्याला मिळाले होते. मातीत कुस्त्या खेळणे या प्रशिक्षणात तो चांगला पारंगत झाला.**

जिवाजी दांडपट्टा तर असा फिरवायचा की पायाच्या टाचेखाली ठेवलेल्या लिंबाचे तो डोळ्याचे पाते लवते ना लवते तोच दोन तुकडे करायचा. उंच उड्या मारण्यात तर तो निष्णात होता. उड्डाण मारल्यावर हवेतच शत्रूच्या शरीराचे दोन तुकडे करत असे. शिवाय त्याची नजर तीक्ष्ण होती. शिवरायांना जेव्हा जिवाजी महालेविषयी समजले; तेव्हा त्यांनी जिवाजीला खास सैन्यात दाखल करून घेतले. तरणाबांड–भरदार मान–जाड पल्लेदार मिशा, सरळ नाक, भलेमोठे कपाळ आणि भेदक नजर पाहताच शत्रूलाही कापरे भरत होते. शरीराने वाघ–सिंह ज्याप्रमाणे भक्ष्य पकडण्यासाठी धावतात त्याप्रमाणे तो अतिशय चपळ होता. शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी विजापूरच्या दरबारात बडी बेगमने सर्व मातब्बर सेनापती, सरदारांना बोलावले होते. तिने सर्वांना सवाल केला, शिवाजीला कोण पकडून आणेल? दरबारात तर शांतता पसरली. तेवढ्यात मागून एक प्रचंड देहाचा, पायातील वहाणा कर्रकर्र वाजवत दरबारात आला. त्याने बडी बेगमचे आव्हान स्वीकारले.

अफजल खान निश्चितच हे काम फत्ते करणार असा विश्वास तिला वाटू लागला. भल्याबु–या मार्गाने किंवा विश्वासघाताने अनेक शत्रूंना संपवण्यात तो तरबेज होता. अफजल खान आपल्यासोबत हजारो सैनिक, घोडदळ–पायदळ घेऊन मजल दरमजल करत महाराष्ट्रात दाखल झाला. तेव्हा शिवराय रायगडावर होते. रायगड सोडून शिवरायांनी प्रतापगडावर जाण्याचा विचार केला. कारण प्रतापगड सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय योग्य किल्ला होता. शिवाय डोंगरी किल्ला असल्याने एकावेळी एकच व्यक्ती तेथे जाऊ शकत होती. आजूबाजूचा परिसर संपूर्ण जंगलाने वेढलेला, त्यात हिंस्र पशू–प्राणी, जंगली श्वापदांचा वावर असल्याने प्रतापगडावर जाणे खूपच अवघड होते. शिवराय प्रतापगडावर पोहोचल्याचे वृत्त समजताच अफजल खान खूप चिडला. त्याने हिंदू देवदेवतांची देवळे पाडण्यास सुरुवात केली. त्यामुळे तर शिवाजीराजे खाली येतील असा त्याचा कयास होता. शिवरायांना ही नीती माहिती होती. ते पाहून त्याने सेवकामार्फत शिवाजीराजांना भेटण्याचा निरोप पाठवला, तुम्ही माझ्या मुलांसारखे; मला भेटण्यास या, आमचे किल्ले परत द्या, मी तुम्हाला बादशहाकडून जहागिरी देतो. शिवरायांनी टोला मारला,मला तुम्हाला भेटायची भीती वाटते, तुम्ही प्रतापगडाच्या पायथ्याशी या. असे म्हणताच अफजल खान खुश झाला.

भेटीची तारीख आणि वेळ ठरली. महाराजांनी सगळ्यांना कामे वाटून दिली. जिवा तुम्ही सय्यद बंडावर नजर ठेवायची, असे सांगून त्यांना सोबत घेतले. भेटीचा दिवस उजाडला. प्रतापगडाच्या पायथ्याशी सुंदर शामियाना उभारण्यात आला होता.

अफजल खानाचे मनोराज्य चालू होते. महाराज गडाच्या पाय–या उतरत असताना, थोड्या अंतरावर सय्यद बंडा उभा होता. जिवाजींनी सय्यद बंडाविषयीची माहिती महाराजांना दिली. त्याला तेथून दूर करण्यास सांगितले. महाराजांनी वकिलामार्फत निरोप पाठवून सय्यद बंडास दूर करण्यास सागितले. अफजल खान, त्याचा वकील कृष्णाजी भास्कर कुलकर्णी शामियान्यात होते. अफजल खानाने शिवरायांना दोन्ही हात हवेत पसरून आलिंगन दिले. त्यांची मान डाव्या कुशीत दाबून ठेवली आणि उजव्या हाताने कट्यारीने पाठीवर वार केला. अंगात चिलखत असल्याने कट्यार घसरत गेली.अंगरखा टराटरा फाटत होता. शिवरायांनी क्षणाचाही विलंब न लावता अस्तन्यात लपवलेला बिचवा काढून खानाच्या पोटात खुपसला.

शिवरायांवर त्याच्या वकिलाने हल्ला चढवला. शिवाजीराजांनी कृष्णाजी कुलकर्णी याचेही तलवारीने दोन तुकडे केले. इकडे सय्यद बंडा गोंधळाचा आवाज ऐकून धावत आला. महाराजांवर हल्ला करणार इतक्यात जिवा महालेने सय्यद बंडाचा समशेर असलेला हात वरच्यावर हवेत कापला. शिवरायांनाही या चपळाईचे कौतुक वाटले. तेव्हापासूनच 'होता जिवा म्हणून वाचला शिवा' हा वाक्प्रचार रूढ झाला. सुरतेच्या स्वारीतही जिवाजींनी महाराजांना वाचवल्याची नोंद आहे. वीर जिवाजी महाले यांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन लाखोंचा पोशिंदा छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राण वाचविले होते. त्यांच्या बलिदानाचे स्मरण व्हावे यासाठी दरवर्षी विविध ठिकाणी जिवा महाले यांची ९ ऑक्टोबर ला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मोठया उत्साहात साजरी केली जाते.

**– संकलन: प्रा.सोमीनाथ खंडागळे**

## परळी हा येणाऱ्या काळात दिव्यांगांसाठी सर्वात जास्त सुविधा उपलब्ध करून देणारा मतदार संघ असेल : ना.धनंजय मुंडे

**● दिव्यांगांच्या हृदयातील वेदना ओळखणारा नेता म्हणजे ना.धनंजय मुंडे- डॉ.संतोष मुंडे**

**● भव्य मोफत श्रवण यंत्र शिबिराचा घेतला १००० कर्णबधिरांनी लाभ**

**● ३७०० पेक्षा जास्त नागरिकांनी केली नवीन नावनोंदणी**



**परळी । प्रतिनिधी**

कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांतून दिनांक ७ ऑक्टोबर व ८ ऑक्टोबर रोजी श्रीनाथ हॉस्पिटल येथे कमी ऐकू येणाऱ्या / कर्णबधिर रुग्णांसाठी मोफत डिजिटल श्रवणयंत्र (कानाच्या मशीन) वाटप शिबीर अतिशय यशस्वी पणे संपन झाले .

तब्बल १००० कर्णबधिर नागरिकांना या डिजिटल श्रवण यंत्रांचे मोफत वाटप करण्यात आले आणि ३७०० पेक्षा जास्त नवीन नागरिकांनी आपली नाव नोंदणी केली. अशी माहिती दिव्यांग मंत्रालयाचे उपाध्यक्ष व शिबिराचे संयोजक डॉ. संतोष मुंडे यांनी दिली. या भव्य मोफत शिबिराचे उद्घाटन राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री ना.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या शुभहस्ते झाले.

या प्रसंगी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, परळी विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख जिल्हा शल्य चिकित्सक डॉ .थोरात साहेब,श्रीनाथ मानव सेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ एकनाथ मुंडे,बीड जिल्ह्याचे गटनेते अजयजी मुंडे,परळी तहसीलचे उपविभागीय अधिकारी लाटकर साहेब, तहसीलसर व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार रुपणर साहेब,राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके ,परळी मेडिकल असो.अध्यक्ष डॉ.शालिनीताई कराड ,सचिव डॉ. मनोज मुंडे ,पवन मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिराच्या उद्घाटप्रसंगी बोलताना परळी हा येणाऱ्या काळात दिव्यांगांसाठी शक्य तितक्या सुविधा उपलब्ध करून देणारा मतदार संघ असेल असे धनंजय मुंडे म्हणाले. डॉ. संतोष व त्यांची टीम दिव्यांगांना विविध सहाय्यक उपकरणे मोफत उपलब्ध करून देण्यासाठी सतत शिबिरे घेत असतात. त्याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे असेही ते पुढे बोलताना म्हणाले.

तदनंतर या शिबिराचे संयोजक दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी प्रास्ताविकात बोलताना दिव्यांगांच्या हृदयाच्या वेदना जाणून घेणार नेता म्हणजे ना.धांजय मुंडे आहेत असे उद्गार काढले .

आणि या मोफत वाटप केलेल्या १००० श्रवण यंत्राच्या माध्यमातून १००० गरजू दिव्यांगाच्या जीवनात एक अमुलाग्र बदल होईल असेही ते म्हणाले.

अशा भव्य मोफत दोन दिवसीय शिबिरामध्ये परळी मतदार संघातील तब्बल १००० कर्णबद्धिर नागरिकांना मशिनद्वारे तपासणी करून श्रवण यंत्रांचे वाटप करण्यात आले .तसेच ३७०० पेक्षा जास्त नागरिकांची नवीन नाव नोंदणी करण्यात आली .

१००० श्रवण यंत्रांचे वाटप करणारे हे मराठवाड्यातील सर्वात मोठे शिबीर आपल्या परळी मतदार संघामध्ये ना.धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून यशस्वी संपन्न झाले अशी माहिती या शिबिराचे संयोजक डिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी सांगितले.

मोबाईलचा अतिवापर टाळावा – धनंजय मुंडेंचा सल्ला

माझा पीए कार्यक्रमाकडे येत असताना सांगत होता की मागच्या काही दिवसांपासून त्याला एका कानाने कमी ऐकायला येत आहे. सतत फोनवर बोलल्याने मोबाईलचा अतिवापर होत असल्याने मला सुद्धा एका कानाने कमी ऐकायला येते. आजच्या युगामध्ये कर्णबधीरत्व येण्यासाठी मोबाईलचा अतिवापर हे सुद्धा एक कारण बनले आहे, त्यामुळे मोबाईलवर मोजके व कामाचेच बोलावे तसेच मोबाईलचा अतिवापर टाळावा असा सल्लाही यावेळी धनंजय मुंडेंनी उपस्थितांना दिला.

## नाट्यगृहास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे नाव द्या: आ.लक्ष्मण पवार

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाट्यगृह नामकरण न.प. केला ठराव मंजूर; आमदार लक्ष्मण पवारांच्या मागणीची दखल**



**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील कोल्हेर रोड येथे वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या नाट्यगृहाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी आ.लक्ष्मण पवार यांनी दि.७ ऑक्टोबर रोजी पत्राद्वारे केली होती आ.लक्ष्मण पवार यानी केलेल्या मागणीची दखल घेत गेवराई नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी विक्रम मांडरके यानी घेतलेल्याल्या बैठकीत आ.लक्ष्मण पवार यांच्या आलेल्या पत्रावर कोल्हेररोड वरील उभारण्यात आलेल्या नाट्यगृहाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाट्यगृह असे नामकरण करण्यासाठी ठराव मंजुर करण्यात आला त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाट्यगृह नामकरण झाले आहे त्यामुळे नागरिकांत आनंद व्यक्त होत आहे. यापूर्वी गेवराई शहरातील बाजारात तळावरील तापडीया सिटी सेंटरचे महात्माफुले शॉंपीग सेंटर असे नामकरण करण्यात आले तसेच छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान असे अनेक नाम करण आ.लक्ष्मण पवार यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे

## संपुर्ण सर्मपन व शरणागती केल्याशिवाय भगवान उध्दार करत नाहीत : बालयोगी दिवेगावकर महाराज



**गेवराई । प्रतिनिधी**

परमेश्वराची भक्ति, संपुर्ण समर्पन व शरणागती घेतल्याशिवाय भगवान आपला उध्दार करत नाहीत, त्यासाठी नामस्मरण आपल्या वेळेनुसार करावे. भागवत कथा आपल्या भक्ति मार्गावर घेवून जाते. प्रेम, भक्ति, ज्ञान, वैराग्य याबरोबरच भगवंतांची दिव्य अनुभूती आपल्याला भागवत कथेतून प्राप्त होते असे प्रतिपादन भागवताचार्य बालयोगी हरिहर दिवेगावकर महाराज यांनी केले.

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त श्रीमद् भागवत कथेच्या पाचव्या दिवशी भागवताचार्य दिवेगावकर महाराजांनी आपल्या अमृतमय वाणीतून कृष्णलीला कथन केली. यावेळी त्यांनी कंस कथा, पुतना वध, शकटासुर वध, त्रृणावतार वध, बकासुर वध, कालिया मर्दन असे विविध प्रसंग त्यांनी कथेमध्ये प्रस्तुत केली. गोपाळकाला, गोवर्धन पुजा, रासलीला याबरोबरच कंसाचा वध, उग्रसेनेचा राज्याभिषेक आणि कृष्ण रुक्मिनी विवाह यावरही बालयोगी महाराजांनी चिंतन केले. याप्रसंगी गोकुळातून मथुरेला जेंव्हा श्रीकृष्ण जातात तेंव्हा भावुक होवून दिवेगावकर महाराजांनी उपस्थितांनाही भावुक केले.

याप्रसंगी ह.भ.प.विष्णू महाराज जगताप, ह.भ.प.दत्ताबाबा गिरी, उपस्थित होते.

### महेश कंटे यांचे सुगम संगीत रंगले

**सायंकाळच्या सत्रात आवाज महाराष्ट्र विजेता, सारेगामा फेम महेश कंटे यांच्या सुगम संगीताची सुरेख महफिल रंगली. यावेळी त्यांनी अभंग, संतांच्या रचना, भावगीते सादर करून कार्यक्रमात भक्तिचा रस भरला. यावेळी भाविक भक्तांनी कार्यक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.**

पान १ वरून पुढे.....

## शिवसैनिकांनो, बीड विधासभेची...

झालेला दिसून येत आहे हा झंझावात विधानसभेच्या सभागृहात पोहोचविण्याकरिता आपल्या सर्वांना मोठ्या ताकदीने कामाला लागले पाहिजे. याबरोबरच सर्वसामान्यांचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी देखील सर्व शिवसैनिकांना शिवधनुष्य उचलण्याची गरज असून महाराष्ट्रावर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकविण्यात आपले योगदान देणे अत्यावश्यक आहे. असे शिवसेना उप नेते तथा मराठवाडा संपर्क नेते अर्जुनराव खोतकर यांनी आपल्या भाषणात शिवसैनिकांना आवाहन केले.

### मी घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे- अनिलदादा जगताप

खूप दिवसांपासून अन्याय सहन करतोय. प्रत्येकवेळी मला थांबवण्यात आले व माझा पाय ओढण्यात आला. मात्र आता मी आता घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे. बीड मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकवायचा आहे. कार्यकर्त्याला मोठं करण्यची, त्यांना ताकद देण्याची दानत मुख्यमंत्री शिंदे साहेबांमध्ये आहे व शिंदे साहेबांचा आशीर्वाद, विश्वास आणि पाठबळ माझ्यासोबत आहे म्हणून मला यावेळी कसलीच चिंता राहिली नाही. शिवसैनिकांनो, अफवांवर विश्वास ठेऊ नका बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे आशीर्वाद आणि डॉ श्रीकांतजी शिंदे साहेबांचे सहकार्य आपल्यासोबत आहेत त्यामुळे आपला विजय पक्का आहेच आता तुम्ही कामाला लागा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड विधानसभा जन संवाद दौरा मेळाव्यात केले.

### क्षीरसागर मुक्त बीड हा जनतेचा निर्धार; अनिलदादासाठी बीड मतदार संघात अनुकूल परिस्थिती- सचिन मुळूक

अनेक वर्ष सत्ता भोगून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या क्षीरसागर विरोधात बीडकर आता क्षीरसागर मुक्तीचा नारा देऊ लागले आहे त्यामुळे लबाड क्षीरसागरांना धडा शिकवण्यासाठी आणि या बीड मतदार संघाचा विकास करण्याकरिता अनिल दादा जगताप यांच्याशिवाय पर्याय उरलेला नाही व सध्या बीड मतदारसंघात सर्वोपरी अनिल दादा जगताप यांच्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झालेली आहे. यामुळे बीड मतदार संघावर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा अनिल दादा जगताप यांच्या माध्यमातून फडकविल्या जाईल अशी भावना शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळक यांनी संसदरत्न खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब यांच्यासमोर आपल्या भावना व्यक्त केल्या.

## बियाणे समिती : केंद्रीय कृषी ...

उपक्रमांचे पदाधिकारी हे सदस्य आहेत. नवनियुक्त तीनही पदाधिकाऱ्यांचे कृषिमंत्री धनंजय मुंडे व आ.पंकजाताई मुंडे यांसह माजी आ.संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर आबा चव्हाण, अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

### बियाणे समितीवरील तीनही पदाधिकाऱ्यांबद्दल :

गोविंदराव देशमुख हे परळी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष असून अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे ते माजी सभापती आहेत, याशिवाय परभणी कृषी विद्यापीठाचे कार्यकारी परिषदेचे सदस्य होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य म्हणून सध्या ते कार्यरत आहेत. कृषी पदवीधर असलेले गोविंदराव देशमुख हे प्रगतशील आधुनिक शेतकरी असून शेती विषयक जाणकार आहेत.

ॲड.विष्णुपंत सोळंके हे परळी तालुक्यातील नागापूर येथील रहिवासी असून अंबाजोगाई येथील न्यायालयात ते वकिलीची प्रॅक्टिस करतात. मागील वीस वर्षापासून ते कॉटन फेडरेशनचे संचालक आहेत तसेच उपाध्यक्ष म्हणून कार्यरत राहिलेले होते. ते स्वतः कृषी उद्योजक असून कापूस जिनिंग सारखे कृषिपुरक उद्योग त्यांनी उभे केलेले आहेत. कापूस बियाण्यांचे उत्तम अभ्यासक म्हणून त्यांची ओळख आहे. अतुल मुंडे हे परळी खरेदी–विक्री संघाचे संचालक असून, मुंडेंच्या जन्मगाव नाथरा सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन व मागील पंधरा वर्षांपासून संचालक आहेत. तरुण वयात आधुनिक पद्धतीने प्रगतिशील शेती करणारे शेतकरी म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केलेली आहे. धनंजय मुंडे यांनी ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल गोविंदराव देशमुख ॲड विष्णुपंत सोळंके तसेच अतुल मुंडे यांनी श्री.धनंजय मुंडे व कृषी विभागाचे आभार मानले आहेत.

## बीड शहराचे सांस्कृतिक वैभव ...

असेल ते करण्याचा प्रयत्न करत असतो बीड शहरात सांस्कृतिक वैभव टिकावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आम्ही केलेले आहेत.मोठे–मोठे कार्यक्रम आयोजित करून बीडच्या जनतेला सुख दुःखातून विरंगुळा मिळावा हाच यामागचा हेतू आहे बीड जिल्हा ही जशी संतांची भूमी आहे तसेच कलाकारांची देखील खाण आहे या माध्यमातून महिलांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचा प्रयत्न गेल्या २० दिवसापासून सुरू आहे प्रत्येक प्रभागात झालेला कार्यक्रम आम्ही पाहत आहोत, महिलांमधील प्रचंड आत्मविश्वास यातून दिसून आला आहे फक्त चूल आणि मुल नव्हे तर स्वतःच्या आनंदासाठी मोकळा श्वास घेण्यासाठी महिला पुढे सरसावते यातच खरा आनंद आहे,बदलत्या तंत्रज्ञानामुळे आपल्या आवडीनिवडी बाजूला होऊ लागले आहेत होम मिनिस्टरच्या माध्यमातून महिलांनी घेतलेला जो आनंद आहे तो अतिशय वाखाण्याजोग आहे, पैठणी हे निमित्त मात्र जरी असले तरी यातून हजारो महिलांनी घेतलेला आनंद पैठणीपेक्षा महत्त्वाचा आहे आणि तोच आम्ही मिळून दिला हेच या कार्यक्रमाचे फलित आहे. आपल्या परंपरा जपण्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत आणि हे प्रयत्न यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणारा पुढे असायला हवा येणार्या काळात ज्या–ज्या लोकहिताच्या गोष्टी असतील त्या करण्यासाठी माझा नक्कीच प्रयत्न असणार आहे, घरातील स्त्री ही खूप महत्त्वाची असते स्त्रीने मनात आणले तर चंद्रावर जाऊन जगाचा कानोसा घेण्याची ताकद तिच्यात असते हे विज्ञानाने देखील सिद्ध केले आहे बुद्धी आणि शक्तीच्या बळावर आता कुठलीही गोष्ट अशक्य नाही याच स्त्रीशक्तीचा जागर येत्या काळात झाला पाहिजे यासाठी प्रत्येक स्त्रीने आपले पाल्य शिक्षित करणे,संस्कारित करणे महत्वाचे आहे,घराला घरपण देणार्या स्त्रीने जर ठरवले तर मोठ–मोठे चमत्कार होतात.चांगल्याची संगत खूप महत्त्वाची असते. आपल्या हिताचे काय आहे हे महिलांना चांगले कळते म्हणून इथे उपस्थित महिलांना विंनती करेल की आगामी काळात आपला असाच उत्साह आणि पाठिंबा मिळेल एवढीच अपेक्षा करतो असे ते म्हणाले भाषणानंतर खेळ पैठणीचा सुरू करण्यात आला. यावेळी सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक महाविद्यालयाचे मैदान महिलांनी पूर्ण भरले होते.

## विकासाचा आश्वमेध सुरच...

आलेले कटू अनुभवाचा अभ्यास करून गेवराईच्या राजकीय पुढाऱ्यांनी केलेले मतदारसंघाकडे दुर्लक्ष याची जाणीव ठेवून आमदार म्हणून निवडून आल्या नंतर त्यांनी पूर्ण मतदारसंघाचा बायोडाटा तयार करून टप्प्याटप्प्यानं निधी उपलब्ध करत मतदारसंघातील रस्ते जोडणी ला सुरुवात केली नऊ वर्षांमध्ये मतदारसंघातील प्रत्येक रस्त्याला हायवेची जोडत असताना जास्तीत जास्त शॉर्टकट रस्ता कसा तयार होईल यासाठी आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी प्रामाणिकपणे काम केले मंजूर मंजूर करून आणलेला निधी योग्यरीत्या मार्गे लागावा म्हणून प्रत्येक रस्त्यावर चालू असलेल्या कामाची जातीने पाहणी करत दर्जामध्ये कुठलीही तडजोड न करता गेवराई मतदार संघातील दर्जेदार रस्ते निर्माण करून महाराष्ट्रामध्ये स्वतःची रोडकरी अशी ओळख आमदार लक्ष्मण पवार यांनी निर्माण केलेली आहे. काही काही दिवसावर विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची तयारी आहे सर्व राजकीय पुढारी आपण निवडून कशी येऊ याची जोडणी करत आहे पण गेवराईचे आमदार लक्ष्मण आण्णा पवार निवडणुकीची नव्हे तर मतदारसंघातील रस्ते जोडणी करण्यासाठी काम करत असल्याने जनतेमध्ये आमदार लक्ष्मण आण्णा पवारांचे जनतेत कौतुक करून कहो दिल से अण्णा फिरसे याची चर्चा जनता करत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# डॉ.योगेश क्षीरसागरांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शेकडो युवकांच्या हाती 'घड्याळ'

**बीडमध्ये निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात इनकमिंग ; ना.अजितदादा, धनुभाऊंच्या नेतृत्वामुळे युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे ओढा**

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पक्ष प्रवेश केल्यापासून पायाला भिंगरी बांधून मतदारसंघ पिंजून काढला आहे. त्यांचा जनसंपर्क, प्रभावी कार्यपद्धती पाहून विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते त्यांना साथ देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत.

बीड तालुक्यातील अंजनवती येथे दौऱ्यावर असताना डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत ग्राम पंचायत सदस्य सूर्यभान कार्डिले यांनी पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी पंचायत समिती सभापती काकासाहेब जोगदंड, सरपंच बालासाहेब जाधव, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, पांडुरंग येडे, अभिमान येडे, सुभाष येडे, अशोक येडे, समीर शेख, फुलचंद येडे, श्रीराम घरत, सुनील घरत, माजेद कुरेशी, मिलिंद ठोकळ, दीपक जगदाळे, शिवाजी घरत, आसाराम घरत, राजेभाऊ क्षीरसागर उपस्थित होते. भाळवणी येथील विनोद बहिरवाळ, भारत डोंगर, संतोष मुळे, भाऊ मस्के, जयराम मस्के, अशोक बहिरवाळ, महेश चव्हाण, बिभीषण दहे, बाळू दहे, गणेश बहिरवाळ, शाम बहिरवाळ, अशोक दहे, किरण चव्हाण, वाघमारे, विलास बहिरवाळ, महादेव मुळे, संदीप मुळे, ऋषिकेश बहिरवाळ, रोहित



बहिरवाळ, शुभम बहिरवाळ, सूरज चव्हाण, ओंकार बहिरवाळ, प्रमोद बहिरवाळ, सोमीनाथ दहे, बिभीषण दहे यांच्यासह अनेक तरुणांनी प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, अमर विद्यागर आदी उपस्थित होते. शहरातील कागदी वेस, अजिजपुरा भागातील रवी वडमारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रवेश केला. याप्रसंगी नगरसेवक मुन्ना इनामदार, शुभम धूत, बिलाल शेख, गजानन जवकर, शैलेश गिरी, ज्ञानेश्वर राऊत, किरण बेदरे, डॉ. शेख शकील, शुभम वीर आदींची उपस्थिती होती. आहेर वडगाव येथील शिवाजी रोहिटे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी बालासाहेब काटे, गोरख रोहिटे, बाळू रोहिटे, पिंटू सपकाळ, नवनाथ रोहिटे, कृष्णा सोळूंके, सचिन सोळूंके, जावेद शेख, अजित डोंगरे, धनंजय राऊत, मुकिंद रोहिटे, राजाभाऊ रांजवन, शहाजी कदम, लखन रोहिटे, सुदाम रोहिटे, निवेदक बाबासाहेब रांजवन यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर इनकमिंग होत असून विरोधी पक्षातील शेकडो युवक कार्यकर्ते, पदाधिकारी ना.अजितदादा, धनुभाऊंच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये डॉ.योगेशभैय्यांच्या नेतृत्वाखाली हाती 'घड्याळ' बांधून घेत आहेत. त्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघात पक्षाची ताकद वाढली आहे.

**• डॉ.क्षीरसागरांचा संघटन मजबूत करण्यावर भर**

**ना.अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी एक वर्षापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. तेव्हापासून पक्षाची सदस्य नोंदणी, विविध पद नियुक्त्या, पक्षाचे प्रचार व प्रसाराचे कार्यक्रम राबविणे अशा माध्यमातून निष्ठेने काम करत संघटन मजबूत करण्यावर भर दिला आहे. विकासाचे व्हिजन, थेट जनसंपर्क, तत्पर यंत्रणेमुळे बीड विधानसभा मतदारसंघात डॉ.योगेश यांच्या नेतृत्वावर जनतेचा अधिक विश्वास असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यांचा संघटन मजबूत करण्यावर कायम भर राहिला आहे.**

## महत्वाचे

## तीन देवस्थानांच्या विकासासाठी आ. नमिता मुंदडांच्या प्रयत्नांमुळे सव्वा दहा कोटींचा निधी मंजूर



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आ. नमिता अक्षय मुंदडा यांच्या पाठपुराव्यामुळे केज विधानसभा मतदार संघातील तीन 'ब' वर्ग देवस्थानांच्या विकास कामांसाठी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेतून १० कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून मतदार संघातील केज तालुक्यातील दोन आणि बीड तालुक्यातील एका देवस्थानाची विकासाकामे करण्यात येणार असल्याची माहिती आ. मुंदडा यांनी दिली. केज मतदार संघात अनेक प्रसिद्ध देवस्थाने आहेत. या देवस्थानांचा वाढता प्रसार लक्षात घेता या ठिकाणी विविध सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे झाले होते. मागील वर्षभरात आ. नमिता मुंदडा यांनी मतदार संघातील देवस्थानांच्या विकास कामांसाठी तीन टप्प्यात एकूण १५ कोटी रुपयांचा मंजूर करून आणला होता. त्यानंतर उर्वरित देवस्थानांसाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी आ. मुंदडा यांनी शासनाकडे पाठपुरावा सुरु ठेवला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून ग्राम विकास विभागकडून केज मतदार संघातील तीन देवस्थानांच्या ठिकाणी पायाभूत सुविधा व विकासकामे करण्यासाठी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेतून १० कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये केज तालुक्यातील कुंबेफळ येथील श्री क्षेत्र सिद्धिविनायक देवस्थानासाठी ३ कोटी रुपये, तांबवा येथील श्री क्षेत्र तांबवेश्वर देवस्थानासाठी ४ कोटी २५ लाख रुपये आणि बीड तालुक्यातील नेकनूर येथील श्री संत बंकटस्वामी देवस्थानासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. उपलब्ध निधीमुळे या तिन्ही देवस्थानांच्या ठिकाणी पायाभूत सुविधा मिळणार असल्याने भाविक भाविक भक्तातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. देवस्थानांच्या विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

## राज्यात अनेक ठिकाणी जाणवतोय उकाडा, तर काही ठिकाणी होणार पाऊस

**मुंबई । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून राज्यात उन्हाचा कडाका वाढला आहे. राज्यात ऑक्टोबर हिट जाणवण्यास सुरुवात झाली आहे. अनेक शहरातील तापमान हे ३५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. तर मराठवाडा, विदर्भासह पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह आणि विजांसह हलक्यातील मध्यम पावसाची शक्यता देखील हवामान विभागाने वर्तवली आहे. पुढील २४ तासात राज्यात हवामानाची स्थिती कशी असेल, याचबाबत लोकल१८ च्या टीमने घेतलेला हा आढावा. मुंबई शहर आणि उपनगरात पुढील २४ तासांमध्ये सामान्यतः निरभ्र आकाश राहण्याची शक्यता आहे. तर सायंकाळच्या वेळी अंशतः ढगाळ वातावरण राहून रिमझिम पावसाची शक्यता आहे. तर मुंबईतील कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २६ अंश सेल्सिअस इतके असेल. मुंबईतील कमाल तापमान हे ३५ अंशापर्यंत पोहोचणार असून उकाड्यात वाढ होणार आहे. तर ठाणे, पालघर बरोबरच रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये ही वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. अहमदनगरमध्ये हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये आकाश अंशतः ढगाळ राहून कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २३ अंश सेल्सिअस असणार आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, लातूर, हिंगोली या जिल्ह्यात हलक्या सरींची शक्यता हवामान विभागाने वर्तवली.

## आदित्य महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी भूषण निकम यांना कृषी उद्योजकता विस्तार क्षेत्रातील कार्याबद्दल वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार

**बीड । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील युवा उद्योजक व संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कृषी विस्ताराचे विविध उपक्रम राबवून शेतकऱ्यांना कृषी उद्योजक घडवणारे कळवणचे कृषिभूषण ग्रोवर्स प्रोड्यूसर कंपनीचे अध्यक्ष, ग्रोकेअर कृषी मंच संस्थेचे संस्थापक आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी भूषण निकम यांना महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने २०२२ या वर्षाचा वसंतराव नाईक शेती मित्र हा पुरस्कार कृषी उद्योजकता व विस्तार या क्षेत्रातून राज्यपाल




सी. पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री धनंजय मुंडे, कृषी सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे, कृषी क्षेत्रातील अधिकारी, मान्यवर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व एक लाख वीस हजार रुपयांचा धनादेश असे पुरस्काराचे स्वरूप होते. भूषण निकम यांनी आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयातून शिक्षण घेतल्यानंतर

आत्महत्याग्रस्त कुटुंबातील ५० मुलांना त्यांनी शिक्षण व सांगोपणसाठी दत्तक घेतले असून दरवर्षी त्या मुलांना शिक्षणासाठी व पोषण आहारासाठी ते मदत करत असतात.

भूषण निकम यांना आजवर राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील एकूण ५५ पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांना शेती मित्र पुरस्कार मिळाल्याबद्दल कृषी सामाजिक व विविध क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे..

## कोणत्याही धर्माची कट्टरता संविधानाला घातक! : आसीम सरोदे



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

देशातील धार्मिकता अधिकाधिक कट्टर बनविण्याचे सर्व पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. अशी कट्टरता कोणत्याही धर्माची असो ती संविधानाला घातक असते, असे मत प्रसिद्ध विधीज्ञ अड. आसीम सरोदे यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, बीडचे माजी खासदार कॉ. गंगाधर अप्पा बुरांडे प्रतिष्ठानच्या वतीने 'संविधान संवादा'चे अंबाजोगाई येथे आयोजन केले होते. त्यांच्या सोबत या संवादामध्ये अड. बाळकृष्ण निंबाळकर आणि अड. श्रीया आवले यांनीही सहभाग घेतला. संविधान कीर्तनकार, ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. भारतीय संविधानाची जागोजाग कशी पायमल्ली होते आहे, हे सांगताना आसीम सरोदे पुढे म्हणाले की, संविधानिक पदावर असलेली माणसे असंविधानिक वक्तव्य करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अलिकडेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'लोकसभा निवडणुकीत ४८ पैकी १४ मतदारसंघात 'व्होट जिहाद' झाला आहे असे अत्यंत बेजबाबदार वक्तव्य कोल्हापूर केले आहे. अड. अजय बुरांडे यांनी प्रास्ताविक भूमिका मांडताना सध्य परिस्थितीत संविधानाला निर्माण झालेला धोका आणि त्या पार्श्वभूमीवर कॉ. गंगाधर अप्पा बुरांडे प्रतिष्ठान करीत असलेले काम याचा आढावा घेतला. कॉ. गंगाधर अप्पा यांनी आयुष्यभर शोषित आणि वंचित घटकाची बाजू मांडली. तोच वारसा प्रतिष्ठान पुढे चालवत आहे. त्याचाच भाग म्हणून संविधानला ७५ वर्षे होत असल्याचे औचित्य साधून 'संविधानाची गळचेपी होत आहे काय? असा आजचा संवाद ठेवण्यात आला होता. यापूर्वी या व्यानमालेत तिस्ता शटलवाड, राम पुनियानी, कॉम्रेड गोविंद पानसरे आदी विचारवंताची व्याख्याने झाली असल्याचे यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सविता बनाळे तर कॉ सुहास चंदनशिव यांनी आभार मानले राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## नारायण गडावर महंत शिवाजी महाराजांची भेट!



*नारायण गडाचे श्री महंत शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले व त्यांच्या पावन आशीर्वादाचा लाभ घेतला. त्यांच्या सहवासातील या क्षणाने मनाला एक वेगळी उर्जा दिली, जी आयुष्यभर साथ देणारी आहे. याप्रसंगी महाराजांचा सत्कार करण्याचा सन्मानही लाभला.*

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगामार्फत १० ऑक्टोबर रोजी सुनावणी

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगामार्फत गुरुवार, दि. १० ऑक्टोबर २४ रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, प्रशासकीय इमारत (डेअरी विभाग), पहिला मजला, अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई येथे सुनावणी होणार आहे. अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील अर्जदारांच्या तक्रारींवर आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांच्याकडे सुनावणी होणार आहे.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :- १४७८ / २०२४**

**( मार्फत विधिज्ञ: - श्री एस बी नांदे)**

अर्जदार :-१. सुंगधाबाई लहानु रोहिटे, वय ८० वर्षे, धंदा घरकाम, रा. आहेर वडगांव, ता. जि. बीड. २. आशाबाई सुदाम डोईफोडे, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. ईट ता. जि. बीड,

विरुध्द

गैरअर्जदार :- १. सखाराम लहानु रोहिटे, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. आहेर वडगांव, ता. जि. बीड. २. बाळु लहानु रोहिटे, वय - ५० वर्षे, धंदा - शेती, रा. वरीलप्रमाणे, ३.काशीबाई गंगाराम शिंदे, वय -४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. पालवन, ता. जि. बीड

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे **लहानु खिराजी रोहिटे** हे / या दि. २०/०६/२०२४ रोजी राहते घरी आहेर वडगांव, ता. जि. बीड येथे मयत असुन अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क २ व गैरअर्जदार क ३ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. गैरअर्जदार क १ व २ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०८/१०/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. **पुढील तारीख:- २०/११/२०२४.**

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## प्रतिवादींनी हजर होणेकामी जाहीर समन्स

**श्री. एम. आय.एस. दर्यावर्दी ७ वे सह दिवाणी यायाधीश क. स्तर बीड यांचे न्यायालयात**

**नि. दिवाणी दावा क्रमांक २०४/२०१७**

**कारणे दाखवा नोटीस**
**(सर्वसाधारण नमुना) नमुना ४,**
**अनुसूची एक, परिशिष्ट एच**

**वादी :- बबीता लुंकड**
**विरूध्द**
**प्रतिवादी:- प्रभाकर काकडे व ईतर**
**(अ‍ॅड. निळकंड बार्गजे)**

प्रतिवादी - १२. विठ्ठल पि. किसन गायकवाड, वय- सज्ञान, धंदा- व्यापार रा. सदाशिव इंजिनियरिंग वृंदावन गार्डन जवळ, विठ्ठ रूक्मीनी मंदिराजवळ, बीड. १३. प्रमोद पि. उत्तम गायकवाड, वय- सज्ञान, धंदा- व्यापार व्दारा, राजेंद्र शंकर आनेराव रा. सदाशिव इंजिनियरिंग वृंदावन गार्डन जवळ, विठ्ठ रूक्मीनी मंदिराजवळ, बीड. १४. अनंत पि. केशवराव घोडके, वय- सज्ञान, धंदा- व्यापार. व्दारा, राजेंद्र शंकर आनेराव रा. सदाशिव इंजिनियरिंग वृंदावन गार्डन जवळ, विठ्ठ रूक्मीनी मंदिराजवळ, बीड. १५. उमेश पि अर्जुनराव घोडके, वय- सज्ञान, धंदा- व्यापार. व्दारा, राजेंद्र शंकर आनेराव रा. सदाशिव इंजिनियरिंग वृंदावन गार्डन जवळ, विठ्ठ रूक्मीनी मंदिराजवळ, बीड. १७. प्रकाश पि. शामराव शेटे, वय- सज्ञान, धंदा व्यापार. व्दारा, राजेंद्र शंकर आनेराव रा. सदाशिव इंजिनियरिंग वृंदावन गार्डन जवळ, विठ्ठ रूक्मीनी मंदिराजवळ, बीड

ज्याअर्थी उपरिनामित वादी यांनी या न्यायालयाकडे दावा केला आहे की, सदर दाव्यात प्रस्तावित प्रतिवादी करण्यास दावा दिला आहे. त्याअर्थी याव्दारे फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही सदर दावा विरूध्द कारण दाखविण्या करिता **दिनांक ०८.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता** या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रीतसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त दाव्याचा एकतर्फी सुनावणी होउन निकाल दिला जाईल.

तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही, निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापुर्वी बजावणीकरीता पत्ता देण्यास कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही. आज दिनांक ३०.०९.२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**टिप :- नोटीस प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात लेखी म्हणने दाखल करावे.**

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## आलिबाग चित्रपट महोस्तवात प्रिय नदीस ठरला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट



**माजलगाव । प्रतिनिधी**

भास्कर किसन शिंदे यांच्या 'भास्करनाना फिल्म प्रोडक्शन' या निर्मिती संस्थेची पहिलीच निर्मिती असलेला प्रिय नदीस (Deat River) या लघुपटाने नुकत्याच पार पडलेल्या पाचव्या अलिबाग फिल्म फेस्टीवल-२०२४ मध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा बहुमान पटकावला आहे.

लेखक आर प्रकाश (प्रकाश राठोड) यांनी या चित्रपटाचे लेखन केले असुन विष्णूदादा उगले यांनी हा चित्रपट दिग्दर्शीत केला आहे. तर अमर देवणे यांनी चित्रपटाचे दर्जेदार छायाचित्रन व कलात्मक संकलन केले आहे. चि.प्रसनजित शिंदे, बद्रीनाथ खंडागळे, ड.पूजा देडे व भिमराव घोडेराव या कलाकारांनी भूमिका केल्या आहेत. तसेच सौरभ धापसे व निकेश भांगे यांनी कला दिग्दर्शनाची बाजु सांभाळली तर ध्वनि मुद्रनाचे काम सुभाष कांबळे यांनी तर संतोषमामा चौरे, पृथ्वीराज शिंदे व टिल्लू दळवी यांनी निर्मिती प्रक्रियेत यांचे महत्त्वाचे योगदान दिले. प्रिय नदीस च्या या यशाबद्दल प्रिय नदीस च्या सर्व टिमचे मान्यवर व रसिक प्रेक्षक कलाप्रेमीच्या वतीने सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

**'प्रिय नदीस' हा लघुपट म्हणजे सतत दुष्काळाने होरपळलेल्या मराठवाड्याच्या वेदनेवर मायेने मारलेली फुंकर होय. -विष्णू उगले (दिग्दर्शक)**

**या लघुपटाच्या निमित्ताने मी पहिल्यांदाच निर्माता म्हणून उभा राहीलो आहे. हा पुरस्कार मला नक्कीच पुढच्या चित्रपट निर्मितीसाठी बळ देयील. -भास्करनाना शिंदे (निर्माता)**

## अंडर नाईन्टीन क्रिकेट संघामध्ये राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचा विक्रांतराणा सद्दीवाल याचा समावेश

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील बारावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी चि. विक्रांतराणा अमितसिंह सद्दीवाल या खेळाडूची क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र राज्य या संघामध्ये अंडर नाईंटीन गटातील क्रिकेट संघामध्ये निवड झाली आहे.

निवड स्पर्धा नंदुरबार या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. यानिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ



काकडे यांच्या हस्ते शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. या खेळाडूस पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन सदिच्छा व्यक्त केल्या. या यशस्वी विद्यार्थ्यास क्रीडा शिक्षक श्री. अशोक शिनगारे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे यांबरोबरच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला नेणाऱ्या खोके सरकार विरोधात

## आष्टीत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राज्यव्यापी धरणे आंदोलन ; तहसीलदार यांना दिले निवेदन

**आष्टी । प्रतिनिधी**

सातत्याने महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला हलवण्यात येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मराठी तरूणांचा रोजगार कमी होत आहेत. सातत्याने केंद्र सरकार व राज्यातील खोके सरकार हे येथील उद्योग गुजरातला जात आहे. यामुळे मराठी तरूण बेरोजगारीने त्रस्त झाला आहे. आशा निर्णयाने हक्काचा रोजगार गमवावा लागत आहे. त्या विरोधात आष्टी येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि ७ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयात राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने राज्यव्यापी धरणे आंदोलन करून महायुती सरकारच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आले.



महाराष्ट्रातील सदरील उद्योग गुजरातला हलवण्यात येवू नयेत व मराठी तरूणांना न्याय मिळावा अशा घोषणा बाजी करत युवकांनी फलक दाखवून तहसील कार्यालयातील परिसर दणाणून सोडत धरणे आंदोलन करण्यात आले.यावेळी तहसीलदार वैशाली पाटील यांना निवेदन देण्यात आले या आंदोलनात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव ड रिजवान शेख,युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ऋषिकेश दरेकर, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष डॉ नदीम शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राहुल काकडे, अतुल शिंदे,भरत घोडके, शौकत पठाण,अविनाश तळेकर, भैरव चव्हाण,जिशान सय्यद,शरद आमटे,अरबाज कुरेशी,दत्तु कांबळे,लहू केरूकर,आजिम खान, सचिन पवार,मुजामिल शेख, अरबाज बेग, महम्मद शेख,लहू भवर,अतिक कुरेशी,राजु खेडकर, अस्लम मौगल,मऊली पठाडे,मुदसर सय्यद आदी सहभागी झाले होते.



*बीड : शिवसेनेचे नेते, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे हे बीडमध्ये आले होते. यावेळी महायुतीचा घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी नगरसेवक शुभम धूत, राष्ट्रवादी लिगल सेलचे जिल्हाध्यक्ष ड.नागेश तांबारे, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, राष्ट्रवादी विद्यार्थी शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे आदी उपस्थित होते.*

## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचा बीड दौरा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे बुधवार, दि.९ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड जिल्हयाच्या दौ-यावर येत आहेत त्यांच्या दौ-याचा तपशील खालीलप्रमाणे आहे. बुधवार दि. ९ ऑक्टोंबर २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी ९.५५ वाजता शासकीय हेलीकॅप्टरने बीडकडे प्रयाण. सकाळी १०.३० वाजता बीड यथील पोलीस ग्राऊंडवर आगमन १०.३५ वाजता बीड येथील शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. सकाळी १०.४५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत विविध क्षेत्रातील व्यक्तींशी ते संवाद साधतील. दुपारी १.०० ते २.०० वाजेपर्यंत राखीव. दुपारी २.०० वाजून १० मिनिटांनी शासकीय विश्रामगृह, बीड येथून पोलीस ग्राऊंडकडे प्रयाण. दुपारी २.१५ वाजता शासकीय हेलीकॉप्टरने ते जालनाकडे प्रयाण करतील.

## शालेय शिक्षण समिती अध्यक्षपदी पत्रकार अशोक होळकर यांची बिनविरोध निवड

**पिंपळनेर । प्रतिनिधी**



जिप कन्या उच्च प्राथमिक शाळा पिंपळनेर च्या शालेय शिक्षण समितीवर बीड प्रहार चे संपादक अशोक होळकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे . जिप कन्या उच्च प्राथमिक शाळा पिंपळनेर च्या शालेय शिक्षण समिती निवडीची प्रक्रिया केंद्र प्रमुख सारडा सर यांच्या व पालकांच्या उपस्थितीत पार पडली सर्व सदस्य निवडी नंतर अध्यक्ष पदासाठी पत्रकार अशोक होळकर यांच्या नावाला सर्वांनी पसंती देऊन बिनविरोध निवडीला सर्वांनी एकमताने पाठींबा देऊन अध्यक्ष म्हणून अशोक होळकर यांची निवड केली त्यांच्या निवडीबद्दल सर्व शिक्षक ,सरपंच, माजी जिप सदस्य ग्रामपंचायत सदस्य, पालक,आणि नागरिकांनी अभिनंदनाचा वर्षाव केला.

## छत्रपती साखर कारखान्याची दिपावली सणानिमित्त साखर वाटप सुरू : व्हा.चेअरमन मोहनराव जगताप

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील सावरगाव येथील छत्रपती साखर कारखान्याची दिपावली सणानिमित्त सर्व सभासदांना व लाभधारक सभासदांना सवलतीच्या दरात दि.११/१०/२०२४ ते दि.२१/१०/२०२४ या कालावधीत साखर वाटप सुरू आहे. तरी सर्व सभासदांनी आपले आधार कार्ड ओळखपत्र दाखवून आपली साखर आपल्या भागातील शेतकी विभागीय कार्यालय सावरगाव, मालीपारगाव, माजलगाव , छोटेवाडी, निपाणी टाकळी, पात्रुड, तेलगाव या विभागावरून घेऊन जावी असे आवाहन कारखान्याचे व्हा.चेअरमन मोहनराव जगताप यांनी केले आहे. तसेच दसरा व दिपावलीच्या सर्व सभासदांना हार्दिक शुभेच्छा.

## नेकनूर रुग्णालयात येथे ट्रॉमा केअर सेंटर चालू करा : अशोक शिंदे

**नेकनुर । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील नेकनूर येथे सर्व सोयी नियुक्त स्त्री व कुटीर रुग्णालय आहे, नेकनुर गावाची लोकसंख्या ४०००० हजार पेक्षा जास्त असून नेकनुर ला परिसरातील ७०ते ८० गावाचा रोजचा संपर्क आहे, येथील जाणाऱ्या राज्य महामार्गावर वारववार अपघात होत असून परिसरातील लोक नेकनूर येथे स्त्री व कुटीर रुग्णालय मध्ये उपचारासाठी येत असून त्यांना अपघात झाल्यास पाहिजे ती सुविधा मिळत नसल्याने त्यांना बीड येथे रेफर केले जाते. त्यावेळी अनेकांचे प्राण गेले आहेत तरी अशा वेळी नेकनूर रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर ची अत्यंत आवश्यकता आहे. तरी नेकनूर येते ट्रॉमा केअर सेंटर चालू करण्याची मागणी पत्रकार तथा ग्रामपंचायत सदस्य अशोक शिंदे यांनी केली आहे. बीड जिल्ह्यात सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून नेकनुर ची ओळख आहे, येथील आठवडा बाजारात राज्यासह पर राज्यातील व्यापारी, नागरिक येतात, नेकनुर ला परिसरातील ७० ते ८० गावाचा रोजचा संपर्क आहे, त्या मूळे येथे मोठ्या प्रमाणत वर्दळ असते, राज्य मार्ग आहे या महामार्गावर नेहमीच अपघात होत आहेत, अपघात झाल्यास त्यांना नेकनुर येथील स्त्री व कुटीर रूग्णालयात उपचारासाठी आणल्या नंतर अपघातात जखमी झालेल्यांना येथे कुठलीच अद्यावत सुविधा नसल्याने त्यांना बीड किंवा इतरत्र हलवावे लागत असल्याने अनेकांना वेळेवर उपचार मिळाले नसल्याने अनेकांना प्राण गमवावे लागले आहे तरी नेकनुर येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावे अशी मागणी केली आहे.

# कल्याण नगर येथे आझाद क्रांती सेनेच्या शाखेची स्थापना

## विस्थापितांचा आवाज म्हणजे आझाद क्रांती सेना :राजेश घोडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

दिनांक सहा ऑक्टोबर २०२४ रोजी संध्याकाळी सात वाजता कल्याण नगर तालुका माजलगाव जिल्हा बीड येथे आझाद क्रांती सेनेच्या शाखेची स्थापना करण्यात आली सेना प्रमुख आझाद क्रांती सेना राजेशजी घोडे यांच्या हस्ते या बोर्डाची रिबीन कापून शाखेच्या अनावरण करण्यात आले याप्रसंगी आझाद क्रांती सेना नेते अशोक जी ढगे आझाद क्रांती सेना ऊसतोड कामगार संघटना धारूर तालुका अध्यक्ष बळीराम जी मस्के आझाद क्रांती सेना ऊसतोड कामगार संघटना ता अध्यक्ष वडवणी सतीश जी हनवते, नेते तुकाराम जी शिंदे हे उपस्थित होते. याप्रसंगी बोलत असताना आझाद क्रांती सेना सेनाप्रमुख राजेश घोडे म्हणाले की सरकार आरक्षण हा मुद्दा लोकांमध्ये टाकून लोकांचं मुख्य मुद्द्यापासून लक्ष विचलित करण्याचं काम करत आहे सरकारची हिम्मत असेल तर खाजगी करणार एससी व एसटी ला आरक्षण द्यावं येणाऱ्या काळामध्ये आझाद क्रांती सेना खाजगीकरणात आरक्षण मिळावं यासाठी व्यापक स्वरूपाचे आंदोलन उभा करणार आहे कारण की सद्यस्थितीमध्ये ९८% नोकऱ्या ह्या खाजगीकरणांमध्ये आहेत तर सरकारी नोकऱ्या केवळ दोन टक्के आहे म्हणूनच आमचं म्हणणं आहे की खाजगी करणात आरक्षण लागू करावं. कल्याण नगर येथील शाखेचे अध्यक्ष आकाश गायकवाड उपाध्यक्ष महेंद्र कीर्ते सचिव दीपक मोरे सहसचिव दिनेश कांबळे, विशाल सहजराव सल्लागार भीमा वावळकर सह सल्लागार रमेश किर्ती कार्याध्यक्ष प्रदीप देशमाने यांनी गावातील विविध प्रश्न सोडवण्याची जबाबदारी घेतली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश किर्ते तुकाराम अंभोरे सुधाकर सहजराव सचिन किर्ते शिवाजी कीर्ती नितीन कीर्ती शकील शेख परमेश्वर कीर्ती युवराज कसबे ऋतिक खिल्लारे परमेश्वर पवार योगेश पवार रोहन गायकवाड दीपक कीर्ते किशन सोनवणे गणेश वावळकर धनंजय कसबे अजिंक्य कीर्तन आर्यन कीर्ती फारुख शेख सलीम शेख समीर शेख भारत निर्मळ प्रदीप खिल्लारे महारुद्र कांबळे यांनी परिश्रम घेतले





### जारांगे पाटील सभा ..

*गेल्या आठ दिवसांपासून साक्षाळपिंपरी येथील ग्रामस्थांनी नारायण गड येथे पारंपरिक दसरा मेळावा कामाला श्रमदानातून सुरुवात केली. रोज दहा बारा गावातील महिला पुरुष काम करत आहेत ग्रामस्थांनी नारायण गड येथे येऊन मैदान सफाईतील श्रमदान करून ग्रामस्थ मंडळीनी उन्हातान्हात आपली सेवा दिली.*

## ऐतिहासिक सावरगावातील दसरा मेळाव्यास लाखोच्या संख्येने उपस्थित राहा

### भगवान भक्ती गड बहुजन समाजाचा शक्तीपीठ

**पाटोदा । प्रतिनिधी**

ऐश्वर्य संपन्न राष्ट्रसंत वै.भगवान बाबा यांनी सन १९५१ पासून भगवानगड येथे सुरू केला पारंपारिक दसरा मेळावा त्याच्यानंतर भीमसिंह महाराजांनी मेळाव्याचे परंपरा चालू ठेवली लोकनेते केंद्रीय ग्रामविकास मंत्री स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब या मेळाव्याला उपस्थित राहून संपूर्ण बहुजन समाजाला तिचा देण्याचे कार्य करत असत हाच त्यांचा वारसा पुढे चालवत दसऱ्याचे परंपरा लोकनेते पंकजा गोपीनाथरावजी मुंडे साहेब भगवान बाबा यांचे जन्मगाव सावरगाव घाट येथे सुरू केली आहे. समाज शिकला पाहिजे समाजाची प्रगती झाली पाहिजे महाराष्ट्रातील अठरापगड जाती या मेळाव्यास हजरी लावतात व ताई साहेबांचे अमूल्य असे मत ऐकण्यासाठी येतात. आपला दसरा मेळावा म्हणजे भक्ती आणि शक्तीचा संगम आहे महाराष्ट्रातील तसेच कानाकोपऱ्यातून लोक भगवान बाबा व सरकी मुंडे साहेबांच्या आशीर्वाद देण्यासाठी दसरा मेळाव्याला येतात. ऊसतोड कामगारापासून ते उद्योगपती कारखानदार राजकीय नेते वारकरी मंडळी यांच्या हजेरी लावतात. यामुळे लोक स्वखर्चाने येतात निस्वार्थी भावनेने एकत्र येणे येतात हेच या मेळाव्याचे वैशिष्ट्ये आहेत लाखो लोक या मेळाव्यासाठी येतात. त्यामुळे सर्वांनी शनिवारी १२ ऑक्टोबर रोजी लाखोच्या संख्येने मेळाव्यास उपस्थित राहावे. असे आव्हान राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशन बीड जिल्हाध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सो .मी तालुकाध्यक्ष पाटोदा यांनी केले आहे

## गेवराईच्या रेणुका देवीसमोर साकारलं 'नवदुर्गा शक्ती'







**गेवराई । प्रतिनिधी**

दुर्गा उत्सवाच्या निमित्ताने अजय रुकर व पत्रकार शुभम घोडके यांच्या संकल्पनेवर भव्य असा ''नवदुर्गा शक्ती देखावा साकारला आहे. हा देखावा गेवराईच्या रेणुका देवीच्या मंदिरात आरतीला आलेल्या भाविकांसाठी आकर्षणाचा केंद्र ठरत आहे.

शारदीय नवरात्र उत्सव सर्वत्र मोठ्या जल्लोषात साजरा होत आहे. वेगवेगळ्या रूपात दर्शन देणाऱ्या दुर्गादेवी या उत्सवातील खास आकर्षण असतात. त्याचबरोबरच केलेल्या आकर्षक देखाव्यांची आरास हा देखील मोठा कौतुकाचा विषय असतो. अशाच अप्रतिम देखाव्यांसाठी शहरातील प्रसिद्ध असलेल्या रेणुका देवी मंदिराच्या समोर संकल्पनेवर नवदुर्गा शक्ती हा देखावा फोटो फ्रेम च्या माध्यमातून करण्यात आला. महाराष्ट्रातील ठिक ठिकाणीच्या देवीचे फोटो आणि मुलीच्या जन्मांचे महत्त्व मुलगी आहे आधार, एका नव्हे , तर दोन्ही घरचा...! आई-वडील आणि सासू सासऱ्यांचा..! घराला घरपण देणारी देणारी स्त्रीच आहे...! ती कुणाची आई, माई, ताई, पत्नी असते. याहूनही, ती असते निर्माती, माहेर आणि सासरचा वारसा निर्माण करणारी, तो जपणारी..! असा संदेश देण्यात आला सातत्याने नावीन्यपूर्ण देखाव्यासाठी अजय रुकर आग्रह असतात.देवीच्या दर्शनास मंडपात शिरताच भाविकांना नवदुर्गा शक्तीच्या रुपात नवचैतन्य निर्माण झाले. विशेष रेणुका देवी मंदिराच्या मंडळाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वर्षभर अनेक सामाजिक कार्य देखील केले जातात. वृक्षारोपण, मातोश्री वृद्धाश्रम येथे गरजू साहित्य वाटप, शालेय साहित्य वाटप, डिजिटल शाळा असे अनेक उपक्रम मंडळाद्वारे राबविण्यात येत असतात.


# परळीच्या आयटीआयला लोकनेते गोपीनाथराव मुंडेंचे तर अंबाजोगाई आयटीआयला स्व.प्रमोद महाजनांचे नाव

## पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सुचवली होती नावे ; बीडच्या आयटीआयला स्व.विनायकराव मेटे यांचे नाव

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य व उद्योजकता विभागाने घोषित केलेल्या निर्णयाप्रमाणे बीड जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना मान्यवरांची नावे देण्यात येत असून, बीड जिल्ह्यातील परळी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे तर अंबाजोगाई शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस स्व.प्रमोद महाजन यांचे तसेच बीड शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस स्व.विनायकराव मेटे यांचे आणि महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस राणी पद्मिनी यांचे नाव देण्याचा निर्णय विभागाने जाहीर केला आहे. या नावांबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रशासनाला सूचना केल्या होत्या. त्यानुसार ही नावे देण्यात आली आहेत.





राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अशाप्रकारे मान्यवरांची व समाजभूषण व्यक्तींची नावे देण्याचा निर्णय कौशल्य व उद्योजकता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काही दिवसांपूर्वी जाहीर केला होता. त्यानंतर बीड जिल्ह्यातील प्रमुख ४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे वरीलप्रमाणे नामकरण केल्याबद्दल श्री लोढा यांचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आभार मानले आहेत.